DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 04 एप्रिल 2021, दि. 05 एप्रिल 2021.

5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिंटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 05 एप्रिल 2021, दि. 06 एप्रिल 2021.

6. मा. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांचेकडील स्पष्टीकरण पत्र.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 07 /04/2021.

**आदेश:-**

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनच्या कालावधीत दि. 30 एप्रिल 2021 पर्यंत करावयाच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार संदर्भ क्र. 5 अन्वये या कार्यालयाने आदेश जारी केले आहेत. ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये मा. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांनी संदर्भ क्र. 4 मधील शासन आदेशांमध्ये नमूद बाबींचे स्पष्टीकरण केले आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र. 5 मध्ये नमूद या कार्यालयाचे आदेशातील नमूद बाबींचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

a) सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेस अटी व शर्तीवर देण्यात आलेल्या परवानगीमध्ये ती सेवा सुरळितपणे सुरु राहण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रासंगिक/अनुषंगिक सेवांचाही समावेश असेल. यामध्ये विमानतळावर आवश्यक असलेली मालमत्तेची हाताळणी, तिकिटींग इ. प्रासंगिक/अनुषंगिक बाबींचाही समावेश आहे.

b) परवानगी असलेल्या उत्पादनांच्या उत्पादन प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या अनुषंगिक बाबी आणि उत्पादन प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी तसेच तयार झालेले उत्पादन पाठविण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही प्रमाणपत्रे, कार्यालयीन प्रक्रिया यांनाही परवानगी राहील.

c) 500 पेक्षा जास्त कामगार असलेल्या उद्योगांनी सर्व सोईसुविधांनी युक्त विलगीकरण केंद्र (Quarantine Center) उभारणे आवश्यक आहे. जर उद्योगाच्या आवाराबाहेर अशा प्रकारचे विलगीकरण केंद्र स्थापन केले असेल तर संसर्ग झालेल्या व्यक्तीस त्याठिकाणी हलविताना तो कोणत्याही इतर व्यक्तींच्या संपर्कात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

d) ज्या कृषि विषयक सेवांना अत्यावश्यक सेवांमध्ये सूचिबद्ध केले आहे त्या सेवांमध्ये कृषि विषयक कामे सुरळितपणे सुरु राहण्यासाठी आवश्यक असलेल्या संबंधित बाबी जसे कृषि अवजारे, बियाणे, खते, उपकरणे व त्यांची दुरुस्ती या सेवांचा समावेश राहील.



Scanned by CamScanner

e) अत्यावश्यक सेवांमध्ये सूचिबद्ध करण्यात आलेल्या खाद्यपदार्थांमध्ये चिकन, मटन, अंडी, मासे, पोल्ट्री इ. दुकाने यांचा समावेश राहील.

खालील नमूद बाबींचा आता अत्यावश्यक सेवांमध्ये समावेश करण्यात येत आहे.

a) सेबी (SEBI) ने मान्यता दिलेल्या बाजारांशी संबंधित सर्व कार्यालयांतील मुलभूत सुविधा संस्था जसे स्टॉक एक्सचेंजेस, डिपॉझिटरीज, क्लिअरिंग कार्पोरेशन्स इ. आणि सेबी (SEBI) कडे नोंदणीकृत इतर मध्यस्थ.

b) दूरसंचार सेवांच्या दुरुस्ती/देखभालीसाठी आवश्यक असणा-या बाबी/सेवा.

c) गॅस सिलेंडर पुरवठा.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 05/04/2021 रोजी रात्री 08.00 पासून तात्काळ लागू करण्यात येत असून सदर आदेश दि. 30 एप्रिल 2021 रोजी रात्री 11.59 वाजेपर्यंत लागू राहील. तसेच या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश लागू राहतील.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
6. अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
7. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक रा. प. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद.
14. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. तहसिलदार तथा व्यवस्थापक, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर.
16. गट विकास अधिकारी, पंचायत समिती सर्व जिल्हा उस्मानाबाद.
17. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
18. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner